N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रायगड  **P.S.(ठाणे):** कर्जत  **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0315  **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/12/2021 00:23 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 10/12/2021

**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/12/2021

**Time From (वेळेपासून):** 14:23 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/12/2021  **Time (वेळ):** 00:23 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 003  **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/12/2021 00:23 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 0.2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मौजे भुमि अभिलेख कर्जत ,कार्यालयाचे बाहेर ताकर्जत येथ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** कैलास बाळू पेरणेकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991  (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**  **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | रा सांडशी,ता कर्जत, जि रायगड,कर्जत,रायगड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | रा सांडशी,ता कर्जत, जि रायगड,कर्जत,रायगड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9309712733**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.दत्ता कोंडीबा जाधव | | | 1. रूम नं101,वदांवन गार्डन,, मुद्रे कर्जत,, ता कर्जत, जि रायगड,कर्जत,रायगड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 10,000/रुपये त्यामध्ये 500रुपये दराच्या 20नोटा | 10,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 10,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

**S.No. (अ. क्र.)** **UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.)**

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 10/12/2021 मी कैलास बाळू पेरणेकर वय 30 वर्षे, व्यवसाय- शेती, रा.सांडशी ता.कर्जत, जि.रायगड (मोबाईल नंबर 9309712733) समक्ष अलिबाग पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह रहातो. मौजे अरवंद येथील राहणारे श्री.गणू खंडू मोडक यांनी त्यांचे मौजे अरवंद, ता.कर्जत येथील सर्व्हे नं.14/2018 या जागेची मोजणी होणेकरीता दिनांक 26/10/2021 रोजी उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय कर्जत यांचेकडे अर्ज केला होता. दिनांक 27/10/2021 रोजी 12,000/- रुपये चलन भरले होते. सदर मिळकतीचा उप अधीक्षक भुमि अभिलेख कर्जत विभागाकडील मोजणी समयी हजर राहणे, वहिवाट दाखविणे, जाबजबाब देणे, आवश्यक वाटल्यास तक्रार देणे, पुर्नभेट मोजणी फी भरणे, मोजणीचा नकाशा मिळविणे व त्यासाठी अर्ज करणे, फी भरणे , फर्म भरणे याकरीता श्री.गणू खंडू मोडक यांनी मला दिनांक 19/11/2021 रोजी विशेष अखत्यारपत्र दिले आहे. मौजे अरवंद, ता.कर्जत येथील सर्व्हे नं.14/2018 या जागेची मोजणी दिनांक 25/11/2021 श्री.सचिन भापकर, यांनी केली होती. सदर मोजणीचे वेळी मी हजर होतो. सदर मोजणीची क प्रत मिळणेकरीता मी दोन वेळेस उप अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालयात जावून श्री.जाधव यांची भेट घेतली. व क प्रत देणेबाबत विनंती केली असता त्यांनी नंतर येण्यास सांगितले. त्यानंतर मी दिनांक 6/12/2021 रोजी उप अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालयात जावून श्री.जाधव यांची भेट घेतली. व क प्रत देणेबाबत विनंती केली असता श्री.जाधव यांनी माझेकडे 10,000/- रूपयांची मागणी केली. त्यावर मी त्यांना पावती मिळेल का याबाबत विचारले असता त्यांनी नाही असे सांगितले. त्यावर मी त्यांना ठिक आहे असे बोलून परत आलो. त्यावरून माझी खात्री झाली की, उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालयातील श्री.जाधव हे मौजे अरवंद येथील सर्व्हे नं.14/18 चे मोजणीची क प्रत मिळणेकरीता 10,000/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. तरी श्री.जाधव, भुमि अभिलेख कार्यालय कर्जत यांचेवर योग्य ती कारवाई होणेकरीता मी दिनांक 08/12/2021 रोजी पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे मॅडम, अँन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग यांचेकडे तक्रार दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सुषमा सोनावणे, मॅडम यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने पंचासमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्यास त्यानंतर त्यांचेविरूध्द लाचेचा सापळा आजमाविण्यात येईल असे सांगितले. त्यावर मी सोनावणे मॅडम यांना दिनांक 10/12/2021 रोजी श्री.जाधव यांनी त्यांचे कार्यालयात बोलाविले असल्याचे सांगितले त्यानंतर श्रीमती सोनावणे मॅडम यांनी मला दिनांक 10/12/2021 रोजी 11.00 वा. कर्जत येथे थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे दिनांक 10/12/2021 रोजी 11.00 वाजण्याचे सुमारास श्रीमती सोनावणे मॅडम यांनी मला मोबाईलवर कॉल करून पळसदरी रोडलगत येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझी हिरो होंडा पॅशन प्रो मोटारसायकल क्रमांक एमएच 06 -अ.आर-4686 ने पळसदरी

रेडलगत गेलो असता रस्त्याचे कडेला एक इनोव्हा कार क्रमांक एम.एच-48-अ-7690 उभी होती. सदर इनोव्हामधून श्रीमती सोनावणे मॅडम उतरून त्यांनी पडताळणी पथकातील पोलीस निरीक्षक श्री.पलांडे साहेब तसेच अंमलदार व पंच साक्षीदार 1) श्री.निशिकांत शशिकांत जाधव, वनरक्षक रामराज, ता.अलिबाग 2) श्री. विशाल संपतराव पाटील, वनरक्षक सारळ, ता.अलिबाग, यांचेशी ओळख करून दिली. त्यानंतर श्रीमती सोनावणे मडम यांनी पडताळणीचे कार्यवाहीबाबत आम्हास माहिती देवून योग्य त्या सुचना दिल्या आणि माझी व पंचांची वक्तव्य डिजिटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करून घेतली. व पडताळणीकरीता माझे मोटारसायकल पंच श्री.जाधव यांचेसह उप अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालयात जाण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी सुमारे 12-19 वाजता माझे कडे व्हाईस रेकॉर्डर सुरु करून देवून मी माझे मोटारसायकलने पंच श्री.निशिकांत जाधव यांचेसह उप अधीक्षक भुमि अभिलेख कार्यालय कर्जत येथे जावून श्री. जाधव यांची भेट घेतली. व अरवंदचे क प्रत मागितली असता श्री.जाधव यांनी मला पैसे आणलेत काय असे विचारले त्यावर मी त्यांना काय असे विचारले असता श्री.जाधव यांनी दहा सांगितले असे बोलले त्यानंतर मी त्यांना दहा हजार जास्त होतात ना साहेब असे बोललो असता किती आणले असे विचारले. त्यावर मी त्यांना मी आता आणले नाही असे बोललो. त्यानंतर मी पुन्हा त्यांना दहा हजार जास्त होतात असे बोललो असता त्यांनी डिफी रजिस्टर होत ना तुझं, रजिस्टर थांबलय ना , बोभाटा नको करू असे बोलले. त्यावर मी त्यानां संध्याकाळी येवू का असे विचारले असता मी तासभर आहे असे सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री.शशिकांत जाधव असे माझे मोटारसायकलने पडताळणी थांबलेल्या ठिकाणी परत आलो. सदरचे समक्ष भेटीतील संभाषण व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात आले आहे. त्यानंतर श्रीमती सोनावणे मडम यांनी सांगितले की, सदर संभाषणावरून लोकसेवक श्री.जाधव यांनी मौजे अरवंद येथील जमिन मोजणीची क प्रत देणेकरीता तक्रारदार यांचेकडे 10000/- रूपये लाचेची स्पष्ट मागणी केली आहे. व एक तासात लाचेची रक्कम घेवून बोलविले असल्याचे निष्पन्न झाले असल्याचे सांगितले. त्यानंतर श्रीमती सोनावणे मडम यांनी श्री.जाधव, भुमि अभिलेख कार्यालय कर्जत यांचेविरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरवून त्या अनुषंगाने सापळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही करून योग्य त्या सूचना दिल्या. त्यावेळी मी माझे कडील 10000/- रूपये रक्कम सापळा कारवाईकरीता वापरण्याकरीता श्रीमती सोनावणे मडम यांचेकडे हजर केली. त्यानंतर माझे कडे ॲंथ्रासीन पावडर लावलेले लाचेची रक्कम 10,000/- रूपये माझे पन्टचे पाठीमागील डावे खिशात ठेवले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्रीमती सोनावणे मडम यांनी मला, पंचाना, पथकातील अंमलदार यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर 13.12 वाजता माझी तसेच पंचांची वक्तव्य घेवून त्यानंतर सापळा कारवाई करीता माझेकडे व्हईस रेकॉर्डर देवून मी व माझे सोबत पंच नंबर 1 श्री. निशिकांत जाधव असे माझे मोटारसायकलने तसेच सोनावणे मडम , पोलीस निरीक्षक श्री.पलांडे साहेब तसेच सापळा पथकातील अंमलदार तसेच पंच नं.2 श्री.पाटील असे खाजगी वाहन क्रमांक एमएच-48-ऐ 7690 ने पळसदरी रोड येथून निघून भुमि अभिलेख कार्यालयासमोर पटांगणात आलो असता सोनावणे मडम यांचे सुचनेवरून मी माझी मोटारसायकल थांबवून. मी व पंच श्री.निशिकांत जाधव असे पायी चालत उप अधीक्षक, भुमि अभिलेख कर्जत कार्यालयात गेलो. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार असे उप अधीक्षक भुमि अभिलेख कर्जत कार्यालयाचे बाहेर आजूबाजूस थांबून होते. मी व पंच श्री.निशिकांत जाधव असे उप अधीक्षक भुमि अभिलेख कर्जत कार्यालयात गेलो असता श्री.जाधव हे जेवण करीत होते. त्यांनी मला थांब असे सांगितले. त्यानंतर श्री.जाधव यांनी मला गांव विचारले त्यावर मी त्यांना अरवंद असे सांगितले. त्यानंतर श्री.जाधव यांनी त्यांचे कपाटातून क प्रत काढली व त्यानंतर क प्रत मिळालेबाबत त्यांचे रजिस्टरला माझी स्वाक्षरी घेतली. त्यानंतर जाधव यांनी क प्रत त्यांचे हातात घेवून ते व मी असे कार्यालयाबाहेर गेलो. त्यावेळी श्री.जाधव यांनी माझेकडे हाताचे इशा-याने लाचेची मागणी करून काय ते बोल पटकन असे बोलले त्यावर मी त्यांना तुम्ही सांगितल्याप्रमाणे दहा हजार रूपये आणलेत असे सांगितले. व त्यानंतर मी पन्टचे पाठीमागील डावे खिशातील लाचेची रक्कम माझे डावे हाताने काढून श्री.जाधव यांचेसमोर धरली असता त्यांनी ती त्यांचे डावे हाताने स्विकारून त्यांचे पन्टचे समोरील डावे खिशात ठेवली. व त्यानंतर श्री.जाधव यांनी त्यांचे उजवे हातातील क प्रत मला दिली. मी माझे ताब्यात घेतली व जाधव यांनी लाचेची रक्कम स्विकारली असल्याबाबत मी पुर्व नियोजित इशारा केला व त्यावेळी सुमारे 14○:23 वाजता ॲन्टी करप्शन पथकाने श्री.जाधव यांना रंगेहाथ पकडले व लाचेची रक्कम त्यांच्याकडून जप्त केली. अशा रितीने श्री.दत्ता कोंडीबा जाधव, वय 34 वर्षे, छाननी लिपिक, उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय कर्जत, (वर्ग-3 ) यांनी मी अखत्यारपत्र घेतलेल्या मौजे अरवंद सर्व्हे नं.14/2018 या जागेच्या मोजणीची क प्रत देणेकरीता दिनांक 10/12/2021 रोजी पंच साक्षीदार यांच्या समक्ष 10,000/- रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. त्याप्रमाणे दिनांक 10/12/2021 रोजी 14.23 वाजता 10,000/- रूपये उप अधीक्षक, भुमि अभिलेख कर्जत कार्यालयाचे बाहेर पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारताना ॲन्टी करप्शन ब्युरो, रायगड पथकाने रंगेहाथ पकडून लाचेची रक्कम त्यांचेकडून हस्तगत करण्यात आली. म्हणुन माझी श्री.दत्ता कोंडीबा जाधव, वय 34 वर्षे, छाननी लिपिक, उप अधीक्षक, भुमि अभिलेख कार्यालय कर्जत, (वर्ग-3 ) रा. वृंदावन गार्डन, रूम नं.101, ई विंग, मुद्रे कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड, मुळ रा. हस्सापुर, ता.भोकर, जि.नांदेड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.
ही फिर्याद दिली, सही दि. 10/12/2021 ( कैलास बाबू पेरणेकर )

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Suwarna Prasad Patki(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

K. b. [signature]

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलिस निरीक्षक कर्जत पोलिस ठाणे जि.रायगड

S.S. [signature]

ठाणे अंमलदार
कर्जत पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Suwarna Prasad Patki
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**